## अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र. २

मी ईश्वराला स्मरुन शपथ घेतो की, मी जे काही सांगेन ते खरे सांगेन, संपुर्ण खरे सांगेन आणि ख-या शिवाय काहीही सांगणार नाही.

माझे नाव : फारुक बाला सय्यद,
वय : ३० वर्षे,
व्यवसाय : गॅरेज
राहणार : घोडेगाव, ता. आंबेगाव, जि.पुणे.

**<u>सरतपास : अभियोग पक्षातर्फे सरकारी वकील श्री. पी. एस. वाळके</u>**

१. घोडेगाव पोलीसांनी मला किती तारखेला पंचनाम्यासाठी बोलविले होते ते मला सांगता येणार नाही. आता मला दि.२०/१०/२०२१ रोजीचा पंचनामा दाखवला. त्यावर अनुक्रमांक १ वर माझी सही आहे. त्यातील मजकुराबाबत मला माहिती नाही. पंचनाम्यातील सहीपुर्ता **निशाणी क्र.२७** देण्यात येते. आता मला दि.२०/१०/२०२१ रोजीचा घटनास्थळ नकाशा दाखविला. त्यावर अनुक्रमांक १ वर माझी सही आहे. त्यातील मजकुराबाबत मला माहिती नाही. पंचनाम्यातील सहीपुर्ता **निशाणी क्र.२८** देण्यात येते.

**(साक्षीदार अभियोग पक्षास समर्थन देत नसल्यामुळे सरकारी वकीलांच्या विनंतीवरुन भारतीय पुरावा कायदा कलम १५४ प्रमाणे सरकारी वकीलांना उत्तर सुचक प्रश्न विचारण्याची परवानगी देण्यात आली. )**

२. हे म्हणणे खरे नाही की, दि.२०/१०/२०२१ रोजी घोडेगाव पोलीस स्टेशनचे पोलीस नाईक आर.बी. सुरकूले यांनी मला घटनास्थळ पंचनामा करण्यासाठी बोलविले होते. हे म्हणणे खरे नाही की, ज्या ठिकाणी विनापरवाना फ्लेक्स लावले होते त्या ठिकाणचा पंचनामा करण्यासाठी मला बोलविले होते. हे म्हणणे खरे नाही की, सदर केसमधील फिर्यादी पोलीस नामदेव ढेंगळे यांनी घटनास्थळ दाखविले होते. हे म्हणणे खरे नाही की, पंचनामा माझ्या समक्ष केला म्हणुन मी त्यावर सही केली. हे म्हणणे खरे नाही की, पंचनाम्यातील मजकुर मी वाचुन पाहिला, तो मला खरा व बरोबर वाटला म्हणुन मी त्यावर सही केली. को-या कागदावर सही करण्याचे कारण मला सांगता येणार नाही. को-या कागदावर कोणाच्या सांगण्यावरुन सही केली हे मला आठवत नाही. मी आरोपीला ५ ते १० वर्षांपासुन ओळखतो. तो आमच्या गावातील

आहे. त्यांचे व माझे एवढे चांगले संबंध नाही. हे म्हणणे खरे नाही की, पंचनाम्याकरीता मी हजर होतो व आरोपी माझ्या ओळखीचा असल्याने त्याला वाचविण्याकरीता मी आजरोजी खोटी साक्ष देत आहे.

**सरतपास पुर्ण.**

**<u>उलटतपास : आरोपी पक्षातर्फे वकील श्री. व्ही. आर. काळे यांच्यामार्फत</u>**

३. हे म्हणणे खरे आहे की, आरोपी हे घोडेगावातील सामाजिक कार्यकर्ते आहे. हे म्हणणे खरे आहे की, ते दत्त जयंती यात्रे निमित्त महिला व पुरुष कबड्डी स्पर्धा भरवतात. हे म्हणणे खरे आहे की, आरोपी हे आमदार महेश लांडगे यांच्या आंबेगाव तालुका स्पोर्ट्स फाउंडेशनचे काम करतात.

**उलटतपास पुर्ण.**
**फेरतपास नाही.**

श्रवणोत्तर स्वीकृत,

**सही/-**

**(स्नेहा सुनिल पुळूजकर)**
**प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, घोडेगाव,**
**ता. आंबेगाव, जि. पुणे.**

**दि.११/०२/२०२६**
**घोडेगाव**